| MHRT100006762025 | दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ४८/२०२५<br>निशाणी क्र.१ वरील आदेश<br>(सखाराम मानाजी चौगुले वि. अनिल पांडुरंग चौगुले व.) |
|---|---|

श्री. सखाराम मानाजी चौगुले
उ.व.सु. ६५ वर्षे, व्यवसाय- शेती,
रा.खरवते, ता.राजापूर, जि. रत्नागिरी. ---- अर्जदार

- विरुध्द -

१. अनिल पांडुरंग चौगुले
उ.व.सु. ३५ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
रा. मु. पो. खरवते, ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

२. सपना श्रीधर बावकर
पूर्वाश्रमीची अनिता पांडुरंग चौगुले
उ.व.सु. ४२ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. कासारवाडी, ओणी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

३. दर्शना दशरथ कानसे
पूर्वाश्रमीची कमल पांडुरंग चौगुले
उ.व.सु. ४० वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. मु. पो. विलवडे, ता. लांजा, जि. रत्नागिरी.

४. दिव्या दिपक राजापकर
पूर्वाश्रमीची अंजली पांडुरंग चौगुले
उ.व.सु. ३८ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. मु. पो. शिरवली, ता. लांजा, जि. रत्नागिरी.

५. मानसी मंगेश भिंतळे
पूर्वाश्रमीची रेश्मा पांडुरंग चौगुले
उ.व.सु. ३५ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. मु. पो. वाकेड, ता. लांजा, जि. रत्नागिरी.

६. सावित्री केशव पळसमकर
उ.व.सु. ६० वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. चुनाकोळवण, ता.राजापूर, जि. रत्नागिरी.

७. सरस्वती गणपत मांडवकर
उ.व.सु. ५८ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. कोदवली, ता.राजापूर, जि. रत्नागिरी.

८. जनाबाई सिताराम भितळे
उ.व.सु. ५६ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. वाकेड, ता.लांजा, जि. रत्नागिरी.

९. रुपेश उमेश चौगुले
उ.व.सु. ३२ वर्षे, व्यवसाय- शेती,

१०. अक्षय उमेश चौगुले
उ.व.सु. ३० वर्षे, व्यवसाय- शेती,

११. सुलोचना उमेश चौगुले
उ.व.सु. ५० वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
अ.क्र.९ ते ११ सर्व रा. खरवते,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

१२. सौ. रसिका उमेश शिगम
पूर्वाश्रमीची वैशाली उमेश चौगुले
उ.व.सु. ३६ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
रा. मु. पो. व्हेळ, ता. लांजा, जि. रत्नागिरी.

१३. निलिमा सचिन पाटील
पूर्वाश्रमीची निलिमा उमेश चौगुले

१४. शुभांगी प्रथमेश पुजारे
पूर्वाश्रमीची शुभांगी उमेश चौगुले
वय-२८ वर्षे, व्यवसाय- गृहिणी,
अ.क्र.१३ व १४ धंदा- गृहिणी, ---- सामनेवाला.
अ.क्र.१३ व १४ रा. खरवते,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

०१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन (VIII of 1827) ॲक्ट चे चॅप्टर १(२) अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे, गाव मौजे मधलीवाडी कोदवली, ता. राजापूर जि. रत्नागिरी येथील अर्जातील परि.क्र.१ मध्ये दिलेल्या तपशीलाप्रमाणे सदर मिळकती या अर्जाचा विषय आहेत. अर्जदार व सामनेवाले यांचे मुळ पुरुष कै. मानाजी गणू चौगुले असून त्यांना कै. केशव व सखाराम (अर्जदार)हे मुलगे असून कै. मानाजी हे दि.१०/०९/१९७६ रोजी मयत झालेले आहेत. कै. केशव हे देखील मयत असून त्यांच पत्नी जानकी मयत आहे. मात्र त्यांना कै. उमेश, कै. पांडुरंग, जनाबाई, सावित्री,

सरस्वती अशी मुले होती व आहेत. त्यापैकी कै. उमेश मयत असून त्याला पत्नी सुलोचना, मुलगे अक्षय व रुपेश व मुली निलिमा, शुभांगी, रसिका, सविता असे कायदेशीर वारस होते व आहेत. त्यापैकी कै. सविता अविवाहीत मयत असून तिला सामनेवाले क्र.९ ते १३ हेच कायदेशीर वारस आहेत तसेच केशव यांचा दुसरा मुलगा कै. पांडुरंग मयत असून त्यांना पत्नी चंद्रभागा, मुलगा अनिल, मुली सपना, दर्शना, दिव्या, मानसी असे कायदेशीर वारस आहेत. अशाप्रकारे अर्जदार व सामनेवाला यांची वंशावळ आहे. दावा मिळकती या कै. मानाजी गणू चौगुले यांनी संपादन केलेल्या मिळकती असून त्याची नोंद फेरफार क्र.३६८८ अन्वये करण्यात आलेली आहे. मात्र कै. मानाजी हे मयत झाल्यानंतर त्यांचा खरवते वारस तपास रजिस्टर नं.१५९ अन्वये झाला परंतू केशव हे मोठे असल्याने त्यांचे नाव ए.कु.पु. म्हणून फेरफार क्र.१४१७ अन्वये कागदोपत्री दाखल झाले. वास्तविक वारस रजिस्टर क्र.१५९ अन्वये अर्जदारचे नाव देखील कागदोपत्री दाखल झाले. याकामी अर्जदार यानी तलाठी सजा खरवते यांजकडे सहहिस्सेदार म्हणून नाव लावण्याकरीता दि.०१/०४/२०२५ रोजी अर्ज दिला असता ६क चा उतारा रेकॉर्डला उपलब्ध नसल्याचे सांगून नाव नोंदविण्यास नकार दिला व अर्जदार यांना ''तुम्ही कै. मानाजी गणू चौगुले'' असे लेखी पत्र दिले. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे ते व सामनेवाले हे कै. मानाजी गणू चौगुले यांचे कायदेशीर वारस असल्याचे ठरवून तसा वारस दाखला अर्जदार यांचे नावे मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी सामनेवाला क्र.१ ते ८ यांनी हजर होवून निशाणी क्र.२० येथे व सामनेवाला क्र.९ ते १४ यांनी हजर होवून निशाणी क्र.२३ येथे त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रस्तुत अर्जातील मजकूर त्यांना मान्य व कबूल आहे व अर्जदार यांचे मागण्यांप्रमाणे अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यास सामनेवाला यांची कोणतीही हरकत नाही.

०४. अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार तसेच सामनेवालातर्फे विधीज्ञ श्री. एस. एम. मेस्त्री यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाचे निर्गतीकरीता खालीलप्रमाणे मुद्दा उपस्थित झाल्यामुळे त्यांच्या

कारणामीमांसेसह त्याचे उत्तर खालीलप्रमाणे नमुद करत आहे.

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत का ? | होकारार्थी. |
| २ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

मुद्दा क्रमांक १ व २ बाबत -

०५. अर्जदारांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्ठी देण्यासाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे याकामी दाखल केलेली आहेत.

| अ. क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | अर्जदार यांना तलाठी सजा खरवते यांनी दिलेल्या पत्राची अस्सल प्रत. | नि.क्र.२७ |
| ०२ | अर्जदार यांनी तलाठी सजा खरवते याजकडे सहहिस्सेदार म्हणून नाव लावणेसाठी दिलेल्या अर्जाची पोच. | नि.क्र.५/२ |
| ०३ | गाव मौजे मधलीवाडी (कोदवली) येथील खाते क्र.२६८ च्या उताऱ्याची डिजीटल प्रत. | नि.क्र.२८ |
| ०४ | गाव मौजे मधलीवाडी कोदवली येथील खाते क्र.१४० च्या उताऱ्याची डिजीटल प्रत. | नि.क्र.२९ |
| ०५ | गाव मौजे मधलीवाडी कोदवली येथील खाते क्र.१७७ च्या उताऱ्याची डिजीटल प्रत. | नि.क्र.३० |
| ०६ | गाव मौजे मधलीवाडी कोदवली येथील खाते क्र.९५ च्या उताऱ्याची डिजीटल प्रत. | नि.क्र.३१ |
| ०७ | गाव मौजे मधलीवाडी कोदवली येथील खाते क्र.१८४ च्या उताऱ्याची डिजीटल प्रत. | नि.क्र.३२ |
| ०८ | गाव मौजे खरवते येथील फेरफार क्र.३६८८ च्या उताऱ्याची सहीसूद प्रत. | नि.क्र.३३ |

| अ. क्र. | कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| ०९ | गाव मौजे खरवते येथील फेरफार क्र.१४१७ च्या उताऱ्याची सहीसूद प्रत | नि.क्र.३४ |
| १० | कै. मानाजी गणू चौगुले यांच्या मृत्यूदाखल्याची अस्सल प्रत. | नि.क्र.३५ |
| ११. | अर्जदार यांच्या आधारकार्डची प्रत. | नि.क्र.४२ |
| १२. | अर्जदार यांच्या नावे असलेल्या रेशनकार्डची प्रत. | नि.क्र.५/१२ |
| १३. | अर्जदार यांचे नावचे वीजबीलाची प्रत. | नि.क्र.५/१३ |
| १४. | अर्जदार यांचे नावे असलेली घरपट्टीची प्रत. | नि.क्र.५/१४ |

०६. अर्जदारांच्या मागणीप्रमाणे दि.१८/१२/२०२५ रोजी दैनिक 'सागर' रत्नागिरी आवृत्ती मधील जाहिर नोटीस **(नि.क्र.३६)** काढण्यात आली. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, राजापूर न्यायालयाचे नोटीस बोर्डवर, ग्रामपंचायत कार्यालय खरवते, तलाठी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या जाहिरनाम्याचा दाखला **(नि.क्र.९)** याकामी दाखल आहे. या जाहिरनाम्याच्या व जाहिर नोटीसीच्या प्रसिध्दीनंतर देखील अर्जदार व सामनेवाला हे मयत मानाजी गणू चौगुले यांचे वारस नाहीत अशी तक्रार कुणीही आजतागायत उपस्थित केलेली नाही.

०७. अर्जदार श्री. सखाराम मानाजी चौगुले यांनी याकामी आपले सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र **(नि.क्र.२६)** दाखल केलेले आहे. सरतपासणीचे प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा अर्जातील कथने व दाखल कागदपत्रे यांचेशी पूर्णपणे सुसंगत आहे. अर्जदार यांच्या या अर्जातील कथनांना कोणीही आव्हानीत केलेले नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदार व सामनेवाले हे मयत मानाजी गणू चौगुले यांचे हिंदु वारसा कायदा १९५६ च्या तरतुदीप्रमाणे वारस ठरतात. अशाप्रकारे अर्जदार व सामनेवाला हे मयत मानाजी गणू चौगुले यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्रमांक २ बाबत</u> **-**

०८. मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविलेला आहे. अर्जदार व सामनेवाला हे मयत मानाजी गणू चौगुले यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जदार व सामनेवाला क्र.१ ते १४ हे मयत मानाजी गणू चौगुले यांचे वारस आहेत असा वारस दाखला (Heirship certificate) त्यांना त्यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यावर प्रदान करणेत यावा.

३. अर्जदार याने सिव्हील मॅन्युअलचे परिच्छेद ३१२ च्या तरतुदीप्रमाणे मयत मानाजी गणू चौगुले यांचे नावावरील सर्व मालमत्तांची यादी दाखल करावी.

(येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात उद्घोषीत.)

SWARANJALI SUDHAKAR HAKKE

Digitally signed by SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Date: 2026.05.05 17:26:51 +0530

दिनांक - ०५/०५/२०२६

**(एस. एस. हाके)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, राजापूर.

## CERTIFICATE

"Judgment/Order in :- Civ. M. A. No.48/2025

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

Name of Stenographer:- M. N. Patil.

Court Name :- Civil & Criminal Court, Rajapur.

Date of Decision :- 05-05-2026

Order signed by P.O. on :- 05-05-2026

Order Digitally signed by P.O. on :- 05-05-2026

Order uploaded on :- 05-05-2026